**नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०१७**
चंद्रकांत केळूस्कर वगैरे वि. दत्तविजय कुबल

## निशाणी क्र. ५४ वरील आदेश.

प्रस्ततुचा अर्ज प्रतिवादी याने त्याचेविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करुन त्याची कैफियत दाखल करुन घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीने अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे.

२. प्रतिवादी याने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, तो गरीब असून मासेमारी करुन स्वतःचे पोट भरतो. त्याला दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर पाठदुखीचा प्रचंड त्रास सुरु झला तसेच तयाला मानसिक आजार देखील सुरु झाला. त्यामुळे त्याला विविध शासकीय कार्यालयात जावून व आवश्यक माहिती, कागद मिळवून विहित मुदतीत कैफियत सादर करता आली नव्हती, त्यातच त्याला मुलगा योगेश कुबल याचेही अपघाती निधन झाले होते. त्यामुळे प्रतिवादी हा शारिरिक व मानसिक अवस्थेने कोलमडून गेला होता. त्यामुळे वेळेत कैफियत देता आली नाही. प्रतिवादी याने कैफियत देण्यास जाणीवपुर्वक विलंब केलेला नाही. प्रतिवादी याला गुणवत्तेवर त्याची बाजू मे. न्यायालयात मांडावयाची आहे. सदर कामी वादीचा उलटतपास अदयाप झालेला नाही. तरी नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी याला झालेला विलंब माफ करणेत येवून प्रतिवादीविरुध्द झालेला आदेश रद्द करणेत येवून त्याची कैफियत देण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी विरुध्द दि. १७/०६/२०१७ रोजी म्हणजेच सहा वर्षापुर्वी विना कैफियत आदेश झालेला असून प्रतिवादी वकीलांमार्फत हजर होवून तो कोर्टात ब-याच तारखांना हजर राहिलेला आहे. प्रतिवादीस दाव्याची संपुर्ण माहिती होती. अर्जात नमूद कारणे खोटी असल्यास प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

४. दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी हे आपल्या वकीलांमार्फत दाव्यात हजर

झाले. परंतु त्यांनी आपली कैफियत निर्धारित कालावधीमध्ये दाखल केली नाही. त्यामुळे दि. १७/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुतचा दावा त्याच्याविरुध्द विनाकैफियत चालविण्याचा आदेश पारीत करणेत आलेला आहे. त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि. २८/०६/२०२३ रोजी दाखल केला आहे. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी यास जवळजवळ सहा वर्षापेक्षा जास्त वर्षे इतका काळ झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा आज्ञार्थी व मनाई ताकीदीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी याने अर्जात कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाची नमूद केलेली कारणे स्वीकारार्ह नाहीत. परंतु, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रतिवादी यास त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यास त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होवून प्रकरणांची संख्या वाढून गुंता निर्माण होणार नाही. तथापि, झालेल्या विलंबाबाबत प्रस्तुत प्रतिवादी वर खर्च लादणे उचित दिसते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

– आदेश –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी याने वादीस रक्कम रु. ७००/– खर्चापोटी द्यावेत.

३. प्रतिवादीने आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.

दिनांकः ०३/०२/२०२४